क्र. १८/ब/ले.प.अ./२७९९,

मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकणभवन, ६ वा मजला, नवी मुंबई-४००६१४.

दिनांक :-

विषय :- जिल्हा परिषद व नगर परिषद लेखा परीक्षण अहवाल मधील त्रुटी व उणिवा बाबत ---

परिपत्रक :-

आपल्या विभागांतील सर्व जिल्हा परिषदांचे सन १९८६-८७-८८ चे लेखा परीक्षण पुर्ण झाले असून अहवाल जवळ जवळ निर्गमित झाले आहेत. तसेच नगरपरिषदांच्यो अनेक लेखा परीक्षण अहवाला निर्गमित झालेले आहेत. प्राप्त अहवाल मान्यतेकरीता छाननी करीत असतांना आपल्याला ब-याच त्रुटी व उणिवा त्या त्या वेळी जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी यांच्या नजरेला आणूनही दुरूस्ती करणे शक्य झाले नसेल. ब-याच उणिवा आपल्या स्तरावर दुरूस्ती होऊन अहवाल मान्य झाले असण्याची शक्यता आहे. जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी यांना वेळोवेळी सूचना देऊन सुध्दा अहवालांतील परिच्छेदांत ब-याच उणिवा राहतात व परिपूर्ण नसतात. सदर उणिवांचे किंवा त्रुटींचे स्वरूप निरनिराळे प्रकारचे असू शकते. त्यापैकी कांही उणिवांचे नमुने खाली देण्यांत आले आहेत :-

[१] आपल्या कार्यालयाकडून व मुख्य लेखा परीक्षकांचे कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे पालन न करणे.

[२] अहवालांना जोडावयाची सर्व परिशिष्टे नसणे,

[३] आक्षेपांच्या परिच्छेदात अपुरी किंवा चुकीची माहिती असणे, उदा. खर्चाचे शिर्षक, प्रमाणक क्रमांक, अनुदानाचा प्रकार आदिची माहिती नसणे.

[४] आक्षेपांचे परिच्छेद आवश्यकतेपेक्षा जास्त लांबड लावून लिहिणे व शेवटी जुजबी रकमांची वसूली दाखविणे.

[५] वस्तुस्थिती लक्षांत न घेता पोकळ माहिती वरून आक्षेप तयार केल्यामुळे ते विद्वत्ता-प्रचुर होतात.

[६] परिच्छेदाला लागणारी अचुक माहिती न देणे उदा. १. जड वस्तु ब-याच कालावधी पासून पडून आहेत त्याकरीता, जड वस्तूच्या खरेदीची तारीख नसणे
२. एकाच दिवशी एका ट्रकच्या १० फे-या होणे अशक्य आहे असे म्हणताना दोन ठिकाणांमधील अंतर न देणे.
३. खर्च अवास्तव आहे असा उल्लेख करताना तुलनेसाठी इतर पुऱ्या खर्चांची माहिती नसणे इत्यादी.

.. २ ..

[७] आक्षेपांत सक्षम अधिकारी कोणते याची माहिती नियम दाखवून न देता केवळ सक्षम अधिका-यांची मंजूरी नाही. असा उल्लेख करणे तसेच लेखा संहिता/कार्यालयीन नियम पुस्तिका यांतील तरतुदींचे/सूचनांचे पालन झालेले नाही असा मोघम उल्लेख करणे, प्रशासकीय बाबी बदलचे आक्षेप घेणे, व्यक्तीचे नामनिर्देशन करून हेतुं-पुरस्सर आक्षेप घेणे इत्यादी.

[८] परिच्छेद लिहितांना जे नियमाप्रमाणे केलेले आहे. त्याची माहिती जरूरीपेक्षा अधिक देणे व जे नियमाप्रमाणे केलेले नाही त्याची [illegible] नगण्य असणे.

[९] आक्षेपांची भाषा आक्रमक व अशोभनीय, पूर्वग्रह दूषित व ऐकिव माहितीवर आधारित असणे.

वर नमुन्यादाखल उणिवांचा उल्लेख केलेला आहे. परंतु अन्यही उणिवा/त्रुटी नजरेस आल्या असण्याची शक्यता आहे. वास्तविक आक्षेप परिच्छेदांचे स्वरूप कसे असावे त्या बद्दलची मार्गदर्शक सुचना कार्यालयीन नियम पुस्तिकातील परिच्छेद ६९३ ते ६९७ मध्ये विस्तृतरित्या दिलेली आहे. पण त्याचे दुर्लक्ष होऊन लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेदांची प्रारुपांची स्वरूपाची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत आहे. म्हणून एक प्रबोधनाचे काम म्हणून आपण ह्या दोन वर्षांत निर्गमित झालेल्या प्रत्येक लेखा परीक्षण अहवालाची छाननी करून त्यातील उणिवा/त्रुटी संबंधित जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी यांना कळवाव्यात. प्रत्येक उणिवा कळवितांना अहवालांतील परिच्छेद क्रमांक व उणिवेचे स्वरूप यांचे स्पष्टपणे निर्देशन करण्यांत यावे. सदर कार्यवाही दिनांक ३०.९.८९ पूर्वी होईल असे पहावे. हा उपक्रम जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी यांना प्रशिक्षित व प्रबोधित करण्याच्या उद्देशाने असून त्यांच्यावर कांही कार्यवाही करण्याकरीता नाही. आपण ज्या ज्या वेळी जिल्ह्याला भेटी द्याल त्या त्यावेळी वरील उणीवाबद्दल चर्चा करून पुढील अहवालांत सुधारणा करण्याच्या दृष्टीनेही त्यांना सूचना द्याव्यात.

[ दा. बा. कुलकर्णी. ]
मुख्य लेखा परीक्षक
स्थानिक निधी लेखा, म. रा.
नवीमुंबई.

प्रति,

१. उपमुख्य लेखा परीक्षक [वरिष्ठ]
स्थानिक निधी लेखा, नवीमुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/नागपूर/व औरंगाबाद.

२. उपमुख्य लेखा परीक्षक [कनिष्ठ] स्था. नि. ले. नवीमुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/नागपूर व औरंगाबाद यांना माहितीसाठी सादर.